पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे-४११००७.

दूरध्वनी क्र.०२० - २५६०१२०४
इंजि. - २५६०१२१९
मॅनेज/लॉ/शि.शा.- २५६०१२१६
आर्टस - २५६०१२१३
सायन्स-२५६०१२१४/कॉमर्स-२५६०१२१५
फार्मसी/मेडिकल - २५६०१२२०

परीक्षा विभाग
टेलिग्राफ : "युनिपुणे"
फॅक्स - ०२० -२५६०१२०४
फॅक्स - ०२० - २५६०१२०८
वेबसाईट:www.unipune.ernet.in
वेबसाईट:www.unipune.ac.in
ई-मेल : coe@unipune.ernet.in


संदर्भ : परीक्षा/सी.टास्क/322

दि.२४.११.२००९

मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था.

विषय : विद्यापीठाच्या विविध परीक्षांच्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाबाबत..

महोदय/महोदया,

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३२ [५] [एफ] अन्वये विद्यापीठांच्या सर्व परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन, केंद्रीय मूल्यमापन पध्दतीने करण्याची तरतूद असून कलम ७२ अन्वये परीक्षांचे निकाल ३० दिवसांच्या आत व जास्तीत जास्त ४५ दिवसांपर्यंत लावावयाचे असतात.

विविध परीक्षांचे केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प विविध महाविद्यालये/संस्था येथे आयोजित करण्यात येत आहेत/असतात. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पासाठी महाविद्यालयातील/संस्थेतील विविध शिक्षकांच्या नियुक्त्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन व नियमन करण्यासाठी करण्यात येत असतात. या संदर्भात आपणास विनंती की, केंद्रीय मूल्यमापन प्रकलपांतर्गत केले जाणारे मूल्यमापनाचे काम वेळेत व सुरळीत पार पाडण्यासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेल्या आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी वेळेवर उपस्थित राहण्यास सांगावे. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाच्या ठिकाणी जाताना, संबंधित परीक्षकांकडे महाविद्यालयाचे संमंतीपत्र [ Releaving Order] व त्यामध्ये शिकवत असलेला विषय, अनुभव याचा उल्लेख असावा तसेच त्यांच्याजवळ ओळखपत्र असावे, याची माहिती संबंधित परीक्षक/नियामक यांना द्यावी ही विनंती.

विद्यापीठाच्या वतीने घेतल्या गेलेल्या ऑक्टोबर २००९ मधील काही परीक्षा उशिरा सुरु कराव्या लागलेल्या आहेत व या परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर करण्याच्या दृष्टीने आपले नेहमीप्रमाणे सक्रीय सहकार्य मिळेल अशी खात्री आहे.

कळावे

आपला विश्वासू,

प्रभारी परीक्षा नियंत्रक.